अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## पाचव्या कसोटीत रोहित शर्मा, गिलची शतके; भारताकडे २५५ धावांची आघाडी



✔ **मालदीव** : धरमशाला येथे सुरू असलेल्या पाचव्या कसोटीवरही टीम इंडियाने आपली पकड घट्ट केली आहे. इंग्लंडने पहिल्या डावात केलेल्या २१८ धावांच्या प्रत्युत्तरात टीम इंडियाने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ८ गडी गमावून ४०३ धावा केल्या. इंडियाकडे आघाडी २५५ धावांची आहे.

भारताकडून रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी शतके झळकावली. तर इंग्लंडकडून ऑफस्पिनर शोएब बशीरने चार विकेट घेतल्या. पाचव्या कसोटीत भारताच्या आघाडीच्या पाच फलंदाजांनी ५० हून अधिक धावा केल्या. यामध्ये रोहित शर्माने १०३ धावांची खेळी केली तर शुभमन गिलने ११० धावांची शानदार खेळी केली.

यशस्वी जैस्वालने ५७ धावा, नवोदित देवदत्त पडिक्कलने ६५ आणि सर्फराजने ५६ धावा केल्या. कसोटी क्रिकेटमध्ये गेल्या १५ वर्षांत प्रथमच भारताच्या पहिल्या पाच फलंदाजांनी ५० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

रोहित १६२ चेंडूत १३ चौकार आणि ३ षटकारांसह १०३ धावा करून बाद झाला. शुभमन गिल १५० चेंडूत ११० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. गिलने १२ चौकार आणि ५ षटकार मारले. हे दोघेही बाद झाल्यानंतर पहिली कसोटी खेळत असलेल्या देवदत्त पडिक्कल आणि सरफराज खानने जबाबदारी स्वीकारली. दोघांनी ९७ धावांची भागीदारी केली.

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ९ मार्च २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : १६० वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

# युक्रेनमध्ये मरण्यासाठी भारतीय तरूणांना रशियात पाठवले

### सीबीआयच्या छाप्यात धक्कादायक माहिती

### परराष्ट्र मंत्रालय सुटकेसाठी प्रयत्नशील

✔ नवी दिल्ली : भारतीय तरूणांना शिक्षण आणि अधिक पगाराच्या नोकरीचे आमिष दाखवून रशियाला पाठवण्यात आले. तेथे गेल्यावर त्यांना युध्दभूमीवर सोडण्यात आले. अशा भारतीय तरूणांना मृत्यूच्या दारात सोडवणाऱ्या एजंटांचे एक नेटवर्कच सीबीआयने मोडून काढले. दरम्यान, अनेक भारतीय तरूणांना जबरदस्तीने रशियन लष्करात भरती करण्यात आले असून त्यांना तातडीने सोडवण्यासाठी हा मुद्दा रशियन सरकारकडे नेण्यात येईल, अशी कबुली परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी दिली. त्याचवेळी चुकीची प्रलोभने दाखवून या मुलांना रशियात पाठवणाऱ्या एजंटांवर कारवाई करण्यात येईल, असेही परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी शुक्रवारी पत्रकारांना सांगितले.

आपल्या नियमित पत्रकार परिषदेत जैस्वाल बोलत होते. ते म्हणाले, त्यांना चुकीची आश्वासने आणि माहिती देऊन त्यांना परदेशी पाठवणाऱ्या एजंट आणि समाज विघातक शक्तींविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. सीबीआयने काल अनेक छापे मारून मानवी तस्करींचे काळे कालच उद्ध्वस्त करत त्याबाबतचे अनेक पुरावे गोळा केले आहेत. अनेक एजंटांविरूध्द मानवी



तस्करीचे गुन्हे दाखल केले आहेत.

रशीयन आर्मीसोबत काम करण्यासाठी आलेल्या कोणत्याही जॉब ऑफरवर विश्वास ठेवू नका. त्यामुळे जीविताला धोका होण्याची शक्यता आहे. रशीयन लष्कराच्या सहायभूत कर्मचाऱ्यांमध्ये काम करणाऱ्या तरूणांची सुटका करून त्यांना मायदेशी आणण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत, असे ते म्हणाले. केंद्रीय अन्वेषण पथकाने देशभरातील सात शहरात शोध मोहीम राबवली. त्यात त्यांना अनेक एजंट आढळून आले. त्यातील तिघे रशियातील आहेत. रशियातील खासगी विद्यापीठात प्रवेश देण्याच्या बहाण्याने त्यांना तेथे पाठवण्यात आले. त्यात त्यांबा मोफत अथवा सवलतीत व्हिसा मुदतवाढ आणि शुल्कात सवलत अशी आमिषे दाखवण्यात (पान ७ वर)

#### १८० विद्यार्थी रशियात

दिल्लीतील एका एजन्सीद्वारे १८० जण दिल्लीला पाटवले आहेत. त्यातील बहुसंख्य जण विद्यार्थी व्हिसावर रशियात गेले आहेत. आता एवढ्या सर्व जणांना रशियात कसे पाठवण्यात आले आणि दुतावासातील कर्मचाऱ्यांचा त्यात काही सहभाग आहे का? याचा तपास सीबीआय करत आहे, असे सूत्रांनी सांगितले.

# काँग्रेसच्या पहिल्या यादीत महाराष्ट्रातील कोणी नाही

### ▶ सोलापूरच्या उमेदवाराचे नाव नसल्याने विनाकारण संभ्रम, राजकीय क्षेत्रात तर्कवितर्क

✔ सोलापूर/प्रतिनिधी

काँग्रेसने आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यामध्ये राहुल गांधी हे केरळच्या वायनाडमधून लोकसभेच्या रिंगणात असतील, तर छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल हे राजनंदगडमधून निवडणूक लढवणार आहेत. काँग्रेसच्या या संभाव्य यादीत एकून ३९ उमेदवारांचे नाव असून महाराष्ट्रातल्या एकाही जागी अद्याप उमेदवारी देण्यात आली नाही. दरम्यान सोलापूर मतदार संघातून प्रणिती शिंदे यांची उमेदवारी पहिल्या यादीत जाहीर होण्याची शक्यता होती. ती मात्र फलद्रुप झाली नाही.



सोलापूर मतदार संघात भाजपा आणि काँग्रेसच्या उमेदवारांकडे साऱ्या मतदार संघाचे लक्ष लागले आहे. त्यातच प्रणिती शिंदे यांना उमेदवारी देण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने त्यांनी मतदारसंघ बांधणी आणि प्रचाराचे नियोजन करून प्रत्यक्ष भेटीगाठी घेण्यास सुरवात केली आहे. स्थानिकतेचा मुद्दा आणि त्यांची मतदारांसाठी उपलब्धता या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. भारतीय (पान ७ वर)

#### शशी थरूर पुन्हा तिरुवनंतपूरमधून लढणार

काँग्रेसच्या उमेदवारांच्या यादीत खासदार शशी थरूर हे तिरुवनंतपुरममधून निवडणूक लढवणार आहेत. तर छत्तीसगडमध्ये माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, ताम्रध्वज साहू, ज्योत्स्ना महंत आणि शिव देहरिया यांचा अनुक्रमे राजनांदगाव, दुर्ग, कोरबा आणि जांजगीर-चंपा मतदारसंघातून विचार करण्यात आला. कर्नाटकमधील आठ ठिकाणचे उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. अद्याप चार ते पाच जागांवर अंतिम निर्णय झालेला नाही. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या पारंपरिक गुलबर्गा या मतदारसंघातून यावेळी त्यांचे जावई राधाकृष्ण दोड्डामणी हे तिकीटासाठी आग्रही असल्याच्या बातम्या समोर येत आहेत.

#### प्रियंका गांधींना अमेठीतून?



राहुल गांधी हे केरळमधील वायनाडमधून लढणार असल्याने अमेठीमधून कोण उभं राहणार हे अद्याप अस्पष्ट आहे. या ठिकाणाहून प्रियंका गांधी निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा आहे. रायबरेलीमधूनही प्रियंका गांधी यांच्या नावाची चर्चा आहे.

**२४ उमेदवार सलित आदिवासी अल्पसंख्यांक :** काँग्रेसच्या ३९ उमेदवारांच्या या पहिल्या यादीत १५ उमेदवार सर्वसाधारण गटातील आहेत, तर २४ उमेदवार मागासवर्गीय, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजातील आहेत. काँग्रेसने पहिल्या यादीत छत्तीसगडमधून सर्वाधिक उमेदवार उभे केले आहेत. त्यात जांजगीरमधून शिव दहरिया, कोरबामधून ज्योत्स्ना महंत, दुर्गमधून राजेंद्र साहू, रायपूरमधून विकास उपाध्याय आणि महासमुंदमधून ताम्रध्वज साहू यांना उमेदवारी देण्यात आली आहे. कासारगोडमधून राजमोहन उन्नीथन, कन्नूरमधून के सुधाकरन, वडकारामधून शफी पारंबिल, वायनाडमधून राहुल गांधी, कोझिकोडमधून एमके राघवन, पलक्कडमधून व्हीके श्रीकंदन, अलाथूर-एसीमधून रम्या हरिदास, त्रिसूरमधून के मुरलीधरन, चालकुड्डीमधून बेनी बेहनन, हिलाकुडी इथून एम.के. इडुक्कीमधून ईडन, इडुक्कीमधून डीन कुरियाकोसे, अलप्पुझामधून केसी वेणुगोपाल, मावेलिक्करा-एसीमधून कोडिकुनिल सुरेश, पथनामथिट्टामधून अँटो अँटोनी, अटिंगलमधून अदूर प्रकाश आणि तिरुवनंतपुरममधून थरूर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

## महायुतीचे आज जागावाटप

### ▶ माढ्याची उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार तातडीने दिल्लीला बोलावल्याने आज महाराष्ट्रातील जागावाटप रात्री उशीरा पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान महायुतीत जागावाटपावरून सुरू असणाऱ्या सुंदोपसुंदीचे परिणाम नाराजी अथवा बंडखोरीत होऊ नये यासाठी या



नेत्यांना दिल्लीत बोलावल्याची चर्चा आहे. दरम्यान सोलापुरातील उमेदवार निवडीची शक्यता उद्याच्या बैठकीत नसली तरी माढा मतदार संघातील उमेदवार उद्या जाहीर होण्याची शक्यता पक्षातील वरीष्ठ नेत्यांनी सुराज्यला दिली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवसेनेचे हातकणंगले मतदारसंघातील उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी शासन आपल्या दारी या कार्यक्रम कोल्हापूर आणि इस्लामपूर येथे करण्यात आले होते. इस्लामपुरात कार्यकेम (पान ७ वर)

## यंत्रमागाच्या वीज दर सवलतीची अंमलबजावणी सुरु



✔ **कोल्हापूर** : राज्याचे नवे वस्त्रोद्योग धोरण अमलात येत आहे. त्यातील तरतुदींनुसार साध्या यंत्रमागासाठी १ रुपये व २७ अश्वशक्तीवरील आधुनिक मागासाठी ७५ पैसे अतिरिक्त वीज सवलतीची अंमलबजावणी करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी कोरोची येथे बोलताना केली. महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिली जात असून ज्या भागात ही सवलत लागू नाही तेथेही ती सवलत लागू केली जाईल, अशी घोषणाही त्यांनी महिला दिनाचे औचित्य साधून केली.

हातकणंगले तालुक्यातील कोरोची गावात आज राज्य शासनाच्यावतीने मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियान आयोजित केले होते. यावेळी मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, केंद्र आणि राज्य शासन मिळून डबल इंजिनचे काम करीत आहे.

## हजारभर गुन्हेगारांवर कारवाईची टांगती तलवार

### ▶ ६९ तडीपार, ४३ जणांवर झोपडपट्टीदादा कलम लावणार



✔ **सोलापूर** : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर आणि परिसरामध्ये कायदा व सुव्यवस्थाचाय दृष्टिकोनातून प्रास्ताविक प्रतिबंधक कारवाई ज्यांच्यावर करण्याची आहे अश्या १ हजार ४५ आरोपींची यादी तयार करण्यात आली आहे.

यामध्ये प्रामुख्याने ६९ तडीपार प्रस्तावित तडीपार प्रकरण बनवली जात आहे त्याचबरोबर सार्वजनिक सुव्यस्थेत किंवा सामाजिक सुवस्थेत धोका आहे अशा ४३ गुन्हेगारावर एम पी डी ए कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येणार आहे अशी माहिती पोलिस उपायुक्त परिमंडळ विजय कबाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्याचबरोबर इलेक्शनच्या पेसिफिक तात्पुरत्या कालावधीसाठी प्रतिबंधक आदेश ज्यांना बजावला जातो सी आर पी सी १४४/२,१४५/३ नुसार अशी ३५ लोकांची यादी करण्यात आलेली आहे आणि याव्यतिरिक्त ज्यांच्या नावावर दोन किंवा दोन पेक्षा जास्त गुन्हे आहे मागील पाच वर्षाच्या काळात किंवा मागच्या काही इलेक्शनच्या काळात त्या लोकांच्या विरोधात सीआरपीसी कलम १०७ ११० करण्यात येणार आहे अश्या एकूण १ हजार ४५ इसमांची यादी सोलापूर शहर आयुक्तालयामार्फत तयार करण्यात आलेली आहे लोकसभेची निवडणूक सुरळीतपणे पार पाडण्यासाठी ही कारवाई यापुढेही सुरूच राहणार आहे असे पोलिस उपायुक्त श्री कबाडे यांनी सांगितले.

## उजनीचे पाणी १० मार्च नंतर भीमेतून सोडणार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सध्या धरणात उणे १८ टक्क्यापर्यंत पाणीसाठा खालावला असतानाच सोलापूर शहराकरिता धरणातून१० मार्च नंतर सहा टीएमसी पाणी सोडावे लागत आहे. हे पाणी उजनीतून भीमा नदीतच सोडले जाणार आहे.

कारण मधल्या काही दिवसात सोलापूर ला पिण्यासाठी पाणी सीना नदीतुन सोडले जाणार अशी अफवा पसरली होती.त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील विशेषतः सीना व भीमा नदी काठच्या गावात व शेतकऱ्यांमध्ये सभ्रंम निर्माण झाला होता.



परंतु सीना नदीतुन सोलापूर शहरासाठी कधीही पाणी सोडता येत ...केवळ भीमा नदीच्या माध्यमातून पाणी पुरवठा करणाऱ्या औज व चिंचपुर बंधाऱ्यात पोहचते. सोलापूर शहरासाठी पिण्याकरिता येत्या दोन दिवसांत उजनी धरणातून भीमा नदीवाटे सहा टीएमसी पाणी सोडण्यात येणार आहे. हे पाणी दहा दिवसांत टाकळीजवळील औज बंधा-यात पोहोचेपर्यंत नदीकाठच्या गावांमध्ये दररोज केवळ तीन तास वीजपुरवठा होईल. विद्युत मोटारी लावून पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली असून त्याचे उल्लंघन करणा-या शेतकऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा आदेश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिला आहे. मुळातच उजनी धरणात यंदाच्या वर्षी पाणीसाठा कमी असताना त्यात नियोजनशून्य पाणीवाटप होत अवघ्या चार महिन्यात ४० टीएमसीपेक्षा जास्त पाणीसाठा फस्त झाला आहे.

सध्या धरणात उणे १८ टक्क्यापर्यंत पाणीसाठा खालावला असतानाच सोलापूर शहराकरिता धरणातून सहा टीएमसी पाणी सोडावे लागत आहे. हे पाणी सोडल्यानंतर धरणातील पाणीसाठा आणखी खालावण्याची शक्यता असून त्यातून धरणाच्या पाणलोट क्षेत्र परिसरासह लाभक्षेत्र भागातील शेतक-यांमध्ये रोष वाढण्याची भीतीही व्यक्त होत आहे.

## मतभेद मिटल्यावरच ‘वंचित’चा समावेश

### ▪ प्रकाश अंबेडकरांच्या भूमिकेने महाविकासआघाडीत पुन्हा धाकधूक

✔ **कोल्हापूर** : महाविकास आघाडीत १५ जागांवर मतभेद आहेत. ते मिटल्यावरच वंचित बहुजन आघाडी आघाडीत असणार की नाही ते ठरेल, असे मत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी शुक्रवारी सांगितले. त्यामुळे आघाडीच्या नेत्यांमध्ये धाकधूक वाढली आहे.

राज्यातील अनेक मतदार संघात आंबेडकर यांनी वेगळी भूमिका घेतल्यास महाविकास आघाडीला फटका बसू शकतो. त्यात सोलापुरातील जागेचा समावेश असल्याचे मानण्यात येत आहे. आंबेडकर म्हणाले, लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी झाल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वाट्याला किती जागा मिळणार असा प्रश्न उपस्थित होतोय. पण १५ जागांबाबत महाविकास आघाडीत मतभेद असल्याने आम्हाला या भिजत घोंगड्याच्या निर्णयाची प्रतिक्षा करावी लागणार आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




‘सन्मानजनक’ म्हणजे किती हो ?

कल्याण
226-03-689
मुंबई
800-82-246

# फलटणकर नाईक-निंबाळकरांच्या पंढरीत संयमी डरकाळ्या म्हणाले, शिस्तीत काम न करणाऱ्यांसाठी अजितदादा खंबीर!

▪ रामराजे निंबाळकर अन् मोहिते-पाटील गटाला केले साईड लाईन
▪ फडणवीस अन् पवारांच्या आदेशानुसार काम करण्याचा दिला सूचक इशारा

✔ पंढरपूर, सोलापूर/प्रतिनिधी

‘जे शिस्तीत काम करणार नाहीत, त्यांना वठणीवर आणायला अजित पवार खंबीर आहेत, जे ते बोलतात ते करतात’ या समर्पक शब्दात प्रतिक्रिया देऊन माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी रामराजे निंबाळकर यांना चांगलेच टोलवत, रामराजे निंबाळकर यांना लोकसभेसाठी भाजपा उमदेवाराचे काम करावेच लागेल, असेच जणू सुचित केले.

विशेष म्हणजे माढ्याची उमेदवारी मिळू नये, यासाठी ऐन मोक्याच्यावेळी वेगळे राजकारणाचे डाव टाकणाऱ्या रामराजे निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांना खासदार नाईक-निंबाळकर यांनी जणू साईड लाईन केले. तथापि, हे करताना त्यांनी पंढपुरात अत्यंत संयमाने डकराळ्या फोडल्या. दरम्यान साईड लाईन करताना त्यांनी आमदार जयकुमार गोरे, शहाजी पाटील, बबनराव शिंदे आणि संजयमामा शिंदे या माढा लोकसभेतील चार आमदारांनी माझ्या उमेदवारीला उघड पाठिंबा दिला आहे, सांगोल्याचे आमदार शहाजी पाटील यांनी तर माझ्या उमेदवारीची तडफेने मागणी केल्याचे स्पष्टपणेच खासदार निंबाळकर यांनी सांगत रामराजे निंबाळकर आणि मोहिते-पाटील समर्थकांनी उमदेवारीच्या (पान ७ वर)



#### नवा इतिहास रचणारे मताधिक्य

उमेदवारीला विरोध असू शकतो. रामराजे निंबाळकर यांच्या काही अडचणी असतील म्हणून माझ्या उमेदवारीला विरोध असू शकतो. मात्र, जर पक्षाने मला उमेदवारी दिली विरोध करणारे ९० टक्यांहून अधिक लोक मला समर्थन देतील. या मतदार संघात नवा इतिहास रचला जाईल एवढे मताधिक्य मिळू शकते, असा मोठा आत्मविश्वासदेखील खासदार नाईक-निंबाळकर यांनी व्यक्त केला.

#### शरद पवारांसोबत लढताना मला आनंद

माढा लोकसभेच्या मतदार संघात मला कोणतेही आव्हान नाही. या मतदार संघात ज्येष्ठ नेते शरद पवार लढण्यासाठी आल्यास मला आनंद आहे. विरोधी उमेदवार म्हणून मी त्यांचे स्वागत करतो, असे खासदार नाईक-निंबाळकर यांनी शुक्रवारी प्रसारमाध्यमांना सांगितले.